# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 02 December 2025

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०२ डिसेंबर २०२५ सकाळी ७.१० मि.

****

- राज्यात २६४ नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी आज मतदान
- संसदेच्या हिवाळी अधिवेशनाला प्रारंभ, मतदार यादी पुनरीक्षणासह विविध मुद्द्यांवर कामकाज बाधित
- एड्सविषयी जनजागृती करण्याच्या उद्देशानं काल एड्स दिनानिमित्त विविध उपक्रमांचं आयोजन

आणि

- मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात थंडीच्या लाटेची शक्यता

****

राज्यातल्या २६४ नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी आज मतदान होणार आहे. सकाळी साडे सात ते सायंकाळी साडे पाच या वेळेत मतदारांना आपला मतदानाचा हक्क बजावता येईल. मतदानासाठी निवडणूक होणाऱ्या मतदान क्षेत्रातल्या कर्मचाऱ्यांना भरपगारी सुट्टी देण्याचा आदेश शासनानं जारी केला आहे. ज्या कामगारांना पूर्ण दिवस सुटी देणं शक्य नसल्यास त्यांना मतदानासाठी दोन तासांची सवलत देण्याचे आदेशही देण्यात आले आहेत.

या निवडणुकीसाठी यंत्रणा सज्ज झाली असून, एकूण १२ हजार ३१६ मतदान केंद्रांसाठी ६२ हजार १०८ निवडणूक अधिकारी, कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली आहे.

दरम्यान, न्यायालयात अपील झालेल्या प्रकरणांसंदर्भात २३ नोव्हेंबर किंवा त्यानंतर निर्णय आलेल्या २४ अध्यक्षपदं आणि विविध ठिकाणच्या १५४ सदस्य पदांसाठी सुधारित कार्यक्रमानुसार येत्या २० डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. यामध्ये मराठवाड्यातल्या फुलंब्री, मुखेड, धर्माबाद, निलंगा, रेणापूर तसंच वसमतच्या नगराध्यक्ष पदांसह काही सदस्य पदांचा समावेश आहे.

****

दरम्यान, निवडणूक आयोगाचा हा निर्णय चुकीचा असल्याचं मत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केलं. ते काल छत्रपती संभाजीनगर इथं निवडणूक प्रचारासाठी आले असता, वार्ताहरांशी बोलत होते. निवडणूक आयोग स्वायत्त आहे, मात्र हा निर्णय इतर उमेदवारांवर अन्याय करणारा असल्याचं मत मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केलं. ते म्हणाले...

**बाईट – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही हा निर्णय चुकीचा असल्याचं मत नोंदवलं. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनीही या निर्णयावर टीका केली. मतदानाच्या आदल्या दिवशी आयोगाने असा निर्णय घेणं हे आश्चर्यकारक आणि अनाकलनीय असल्याची टीका सपकाळ यांनी केली.

**

भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनीही राज्य निवडणूक आयुक्तांना पत्र पाठवून, या निवडणुका स्थगित न करता सुरू ठेवण्याची मागणी केली. आयोगाने आपल्या निर्णयाचा सहानभूतीपूर्वक विचार करावा अशी मागणी त्यांनी केली आहे.

**

नांदेड जिल्ह्यात आज १० नगरपरिषदा आणि एका नगरपंचायतीसाठी मतदान होणार आहे. नगराध्यक्ष पदासाठी ७१ तर नगरसेवक पदासाठी ८७३ उमेदवार रिंगणात उतरले आहेत. मतदानासाठी २९१ मतदान केंद्र स्थापन करण्यात आले आहेत.

**

आज होणाऱ्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी काल जिल्ह्यातल्या मतदान पूर्वतयारीचा दूरदृष्य प्रणालीद्वारे आढावा घेतला. संपूर्ण मतदान प्रक्रियेवर जिल्हाधिकारी कार्यालयातील नियंत्रण कक्षातून लक्ष ठेवले जाणार असल्याचं यावेळी स्वामी यांनी सांगितलं.

**

जालन्याच्या जिल्हाधिकारी आशिमा मित्तल आणि पोलीस अधीक्षक अजयकुमार बंसल यांनी काल अंबड आणि भोकरदन शहरात निवडणूक तयारीची पाहणी केली. मतदान प्रक्रियेसंदर्भात त्यांनी सर्वांना मार्गदर्शन केलं.
तर अंबड शहरात काल पोलिसांनी पथसंचलन कलं. निवडणुकीच्या काळात कायदा आणि सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलीस प्रशासन सज्ज असल्याचा संदेश यावेळी देण्यात आला.

**

धाराशिव जिल्ह्यात मतदानाच्या पार्श्वभूमीवर संबंधित नगरपरिषद क्षेत्रातील आठवडी बाजार आज तसंच उद्या बंद राहणार आहेत. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी किर्ती किरण पूजार यांनी काल हे आदेश जारी केले.

****

संसदेच्या हिवाळी अधिवेशनाला कालपासून प्रारंभ झाला. काल पहिल्याच दिवशी विरोधी पक्ष सदस्यांनी मतदार यादी पुनरीक्षणासह विविध मुद्द्यांवर चर्चा करण्याची मागणी करत केलेल्या घोषणाबाजीमुळे लोकसभेचं कामकाज आधी दोन वेळा आणि अखेर दिवसभरासाठी तहकूब झालं. त्यापूर्वी सदनाचं कामकाज सुरू होताच, अध्यक्ष ओम बिर्ला यांनी सदनातील दिवंगत माजी सदस्य अभिनेता धर्मेंद्र यांच्यासह कुमार मल्होत्रा आणि रवी नाईक यांना श्रद्धांजली अर्पण केली.
दरम्यान, अर्थमंत्री निर्मला सीतारमन यांनी मणिपूर वस्तू आणि सेवा कर सुधारणा विधेयक, केंद्रीय उत्पादन शुल्क सुधारणा विधेयक, तसंच आरोग्य सुरक्षा आणि राष्ट्रीय सुरक्षा उपकर विधेयक सभागृहात सादर केलं. मणिपूर वस्तू आणि सेवा कर सुधारणा विधेयक, विरोधकांच्या गदारोळातच आवाजी मतदानानं मंजूर करण्यात आलं.

**

राज्यसभेत काल सभापती सी.पी. राधाकृष्णन यांचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वागत केलं. राधाकृष्णन यांचा उपराष्ट्रपतिपदापर्यंतचा प्रवास लोकशाहीची खरी ताकद दर्शवतो असं त्यांनी नमूद केलं. लोकशाहीच्या सक्षमतेबाबत पंतप्रधान म्हणाले,

**बाईट – पंतप्रधान नरेंद्र मोदी**

राज्यसभेत नवीन सदस्यांचा शपथविधी काल पार पडला. त्यानंतर विरोधकांच्या घोषणाबाजीमुळे राज्यसभेचं कामकाजही दुपारी दोन वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं. प्रश्नोत्तराच्या तासानंतर सदनाचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब झालं.

****

पीएम विश्वकर्मा योजनेअंतर्गत आतापर्यंत दोन कोटी ७२ लाखांहून अधिक कारागिरांनी नोंदणी केली आहे. सुक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योग राज्यमंत्री शोभा करंदलाजे यांनी काल राज्यसभेत एका प्रश्नाच्या लेखी उत्तरात ही माहिती दिली. आतापर्यंत २३ लाख कारागिरांना अपेक्षित प्रशिक्षण तर सात लाख लाभार्थींना २३ कोटी रुपयांहून अधिक प्रोत्साहन निधी देण्यात आल्याचं करंदलाजे यांनी सांगितलं.

****

वक्फ दुरुस्ती कायदा, २०२५ अंतर्गत वक्फ मालमत्ता नोंदणीसाठी सहा महिन्यांची अंतिम मुदत वाढवण्याची मागणी करणाऱ्या याचिकांवर सुनावणी करण्यास सर्वोच्च न्यायालयानं नकार दिला आहे. वक्फ मालमत्ता धारकाला नोंदणीत येणाऱ्या अडचणींच्या पार्श्वभूमीवर, वक्फ न्यायाधिकरणासमोर सहा डिसेंबरपर्यंत अंतिम मुदत वाढवण्याची मागणी करता येईल, असा पर्याय न्यायालयानं सुचवला आहे.

****

देशातल्या मनोरंजन आणि माध्यम जगात खूप क्षमता असून, त्यांचा सुयोग्य वापर होण्याची गरज केंद्रीय माहिती आणि प्रसारण सचिव संजय जाजू यांनी व्यक्त केली. मुंबईत सी आय आय बिग पिक्चर समिटमध्ये ते काल बोलत होते. जागतिक बाजारपेठेत या क्षेत्रातली भारताची भागीदारी केवळ २ टक्के आहे. या संधीचा लाभ घ्यावा, असं आवाहन त्यांनी उद्योगजगताला केलं. एआय आधारित गाणी आणि व्हिडीओ या क्षेत्रातली गणितं बदलत असताना आपणही नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करण्याची गरज असल्याचं जाजू यावेळी म्हणाले.

****

एड्सविषयी जनजागृती करण्याच्या उद्देशानं काल जगभरात एड्स दिवस पाळण्यात आला. या निमित्तानं देशभरात विविध जनजागृतीपर कार्यक्रम पार पडले. केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री जे पी नड्डा यांच्या प्रमुख उपस्थितीत दिल्लीतल्या विज्ञान भवनात राष्ट्रीय स्तरावरील कार्यक्रम झाला.

छत्रपती संभाजीनगर इथं जिल्हा रुग्णालय, जिल्हा एड्स प्रतिबंध आणि नियंत्रण विभागाच्या वतीनं सायकल फेरी काढण्यात आली. चिकलठाणा इथल्या जिल्हा रुग्णालयातून सुरूवात झालेली ही फेरी शहरातल्या विविध भागातून मार्गक्रमण करत आयएमए हॉल इथं विसर्जित झाली.

**

लातूर इथं जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयाच्यावतीने सायकल रॅली काढण्यात आली. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क इथून निघालेल्या या रॅलीला आरोग्य सेवा उपसंचालक डॉ. रेखा गायकवाड आणि सहाय्यक संचालक संजय ढगे यांनी हिरवा झेंडा दाखवला.

लातूर इथं सिध्देश्वर महाविद्यालयातल्या विद्यार्थ्यांनी एड्स जनजागृतीपर सादरीकरण केलं. यावेळी त्यांनी समाजात एड्सबाबत जागरूकता वाढवून `सुरक्षेचा घेऊन पुढाकार एड्समुक्त भारताचा निर्धार` करण्याचं आवाहन केलं.

****

राज्य परीक्षा परिषदेमार्फत येत्या २२ फेब्रुवारी रोजी घेण्यात येणाऱ्या पाचवी आणि आठवी च्या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती परीक्षेचे अर्ज भरण्यासाठी आठ डिसेंबर पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. विलंब शुल्कासह ३१ डिसेंबरपर्यंत अर्ज करता येणार असल्याची माहिती परीक्षा परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी दिली.

****

दित्वा चक्रीवादळाचा जोर ओसरून त्याचं कमी दाबाच्या पट्ट्यात रुपांतर झालं आहे. परिणामी तमिळनाडू तसंच कर्नाटकमधे विजांच्या कडकडाटासह सोसाट्याचे वार वाहण्याची शक्यता आहे. येत्या दोन दिवसात मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात थंडीची लाट येण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

दरम्यान, राज्यात काल सर्वात कमी नऊ पूर्णांक चार अंश सेल्सियस तापमानाची नोंद अहिल्यानगर इथं झाली. त्याखालोखाल पुणे तसंच नाशिक इथं दहा अंश, बीड – दहा पूर्णांक तीन, जळगाव – १० पूर्णांक आठ, संभाजीनगर इथं ११ पूर्णांक सहा, धाराशिव – १३ पूर्णांक सहा तर परभणी इथं १६ पूर्णांक सात दशांश सेल्सियस तापमान नोंदवलं गेलं.

****